




दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार १९ डिसेंबर २०२४ | अंक१० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# संतोष देशमुख याला मारल्यानंतर व्हिडीओ कॉल करुन दाखविले?

## भाजपाच्या आमदाराचा विधानसभेत आरोप



बीड येथील सरपंच संतोष देशमुख हत्याकांडानंतर राज्यात खळबळ उडाली असून बीड येथे बिहारसारखे गुंडाराज सुरु झाल्याचा आरोप होत आहे. संतोष देशमुख हत्याकांडानंतर बीड येथे कायदा आणि सुव्यवस्थेविषयी चिंता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणात विधानसभेत आज भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी धक्कादायक दावे केले आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आधी संतोष देशमुखला गाडीत उचलून न्यायचं महिलांची छेड काढली म्हणून त्याला माराहाण करायचा प्लान होता असा सनसनाटी आरोप भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी केला आहे.सरपंच संतोष देशमुख याची नियोजन पद्धतीने हत्या करण्यात आली असल्याचा आरोप भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी आज विधानसभेत केला आहे. या चर्चेच्या प्रसंगी बीड जिल्ह्यातील राष्ट्र वादीचे नेते मंत्री धनंजय मुंडे आणि भाजपाच्या मंत्री पंकजा मुंडे या दोघापैकी कोणीही उपस्थित नव्हते. संतोष देशमुखला गाडीत उचलून न्यायचं आणि महिलांची छेड काढली म्हणून त्याला माराहाण करायचा प्लान होता. कळंबला एक महिला तयार केली होती, त्या महिलेची चौकशी करायला हवी अशी मागणी यावेळी भाजपाचे सदस्य सुरेश धस यांनी केली.संतोष देशमुखचे डोळे लायटरने जाळण्यात आलेसंतोष देशमुख या तरुणाने भाजपा बुथप्रमुख म्हणून काम केले होते. त्याला १५० ते २०० ठोके मारण्यात आले होते. त्याला मारताना व्हिडीओ कॉल करून कोणाला तरी दाखवण्यात आल्याचे आहे. संतोष देशमुखचे डोळे लायटरने जाळण्यात आले. पाणी मागितलं तेव्हा दुसरं काहीतरी देण्यात आले.

### पोलिसांनी साधी तक्रार घेतली होती.

या प्रकरणात पोलिसांनी आधी साधी तक्रार घेतली होती. दुस-या दिवशी शनिवार ,रविवारी पीएसआय भोसले आणि सुदर्शन घुले संपुर्ण शहरात फिरत होते. महाजन यांच्या सोबत घुले फिरत होते. सुदर्शन घुले याला लगेच सोडण्यात आले. हॉटेलात सुदर्शन घुले आणि पीएसआय भोसले चहा पिताना दिसत आहेत. बीडचं आपण मिटवू असं सीसीटीव्हीत दिसत आहे. सुदर्शन घुले नावाच्या मुलाची मी माहिती घेतली. सुदर्शन घुलेचे सहा पत्र्याचं घर आहे. त्याला स्कॉर्पिओ कुणी दिलेली आहे. सोनपेठवरून वाळूच्या गाड्या चालतात. तीनशे तीनशे गाड्या चालत असतात. दररोज कोटी रूपये गोळा केल्याशिवाय राहत नाही. या कंपन्यांना कोण बोलवून घेतं असा सवाल सुरेश धस यांनी केला आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून ज्येष्ठ समीक्षक डॉ सुधीर रसाळ यांचे अभिनंदन

# समीक्षा क्षेत्रातील व्रतस्थ साहित्यिकाचा सन्मान

नागपूर, दि. १८ : साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल ज्येष्ठ समीक्षक डॉ सुधीर रसाळ यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले आहे. या पुरस्कारामुळे मराठी समीक्षा क्षेत्रातील एका व्रतस्थ साहित्यिकाचा सन्म ान होत आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला आहे.

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या राष्ट्रीय साहित्य संस्थेच्यावतीने साहित्य अकादमी पुरस्काराची घोषणा करण्यात आली. यात डॉ रसाळ यांच्या ङ्गविंदांचे गद्यरूपफ या समीक्षात्मक पुस्तकाला हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

शुभेच्छा संदेशात मुख्यमंत्री म्हणतात, डॉ रसाळ यांचे मराठी साहित्य विश्वातील योगदान अम ुल्य असे आहे. मराठी भाषेचे अध्यापन, संशोधन, संपादन आणि समीक्षा असा त्यांचा चौफ ेर विहार राहीला आहे. विशेषतः त्यांचे मराठी काव्यविषयक संशोधनात्मक लेखन मौलिक असे आहे. समीक्षेतून कठीण विषय सहज-सुलभपणे सम जावून देणारी त्यांची शैली नवोदितांना आश्वासक वाटते, यातच त्यांचे मोठेपण आहे. म राठी भाषा जतन, संवर्धन तसेच साहित्य विषयक चळवळीतील संस्था, समित्यांवरही डॉ रसाळ सक्रीयपणे कार्यरत आहेत. त्यांच्या समीक्षात्मक लेखनाला राष्ट्रीयस्तरावर मिळालेली ही दाद नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. डॉ. रसाळ आजही तितक्याच तडफ ेने लेखन, संशोधनात कार्यरत आहेत. त्यांच्या हातून यापुढेही मराठी साहित्याची अशीच अखंडित सेवा घडत राहो. त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो या शुभेच्छांसह मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी डॉ. रसाळ यांचे अभिनंदन केले आहे.

# राष्ट्रीय ओपन तायक्वांदो स्पर्धेत सेंट अँन्स स्कूलच्या धनंजयने पटकावले सुवर्णपदक



बीड (प्रतिनिधी) – गोवा येथील पेडीएम स्टेडियम येथे पार पडलेल्या ४ थी राष्ट्रीय ओपन तायक्वांदो स्पर्धेत सेंट अँन्स स्कूलच्या धनंजय समाधान आत्तरकर याने सुवर्णपदक जिंकले आहे.

तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने गोवा राज्य संघटना आयोजित ४ थी राष्ट्रीय ओपन तायक्वांदो स्पर्धा पेडीएम इंडोर हॉल गोवा येथे १२ ते १५ डिसेंबर २०२४ दरम्यान पार पडली. गोवा सरकारचे क्रीडामंत्री गोविंद गोंडे व तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव अ‍ॅड. आर. डी. मंगेशकर, भारतीय संघटनेचे निरीक्षक संतोष मोहती (ओडीसा), महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, आयोजित समितीचे सचिव महादेव चव्हाण, महाराष्ट्र संघटनेचे कोषाध्यक्ष व्यंकटेश कर्रा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यजमान गोवा राज्यासह महाराष्ट्र, कर्नाटक, राजस्थान, केरळ, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, गुजरात, आसाम, ओडिसा, मनिपुर, नागालँड आदी राज्यातील ८०० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. या स्पर्धेत सर्वाधिक पदके जिंकून महाराष्ट्र संघाला विजेते पद मिळाले.

या स्पर्धेमध्ये सेंट अँन्स स्कूलच्या धनंजय आत्तरकरने सुवर्णपदक पटकावून शाळेचे नाव राष्ट्रीय पातळीवर उंचावले आहे व तसेच या स्पर्धेमध्ये प्रशिक्षक म्हणून शाळेचे क्रीडाशिक्षक शेख अनिस यांनी काम पाहिले.

या यशाबद्दल शाळेचे प्राचार्या सिस्टर रोजमीन मॅथ्यू, समन्वय सिस्टर सुहीला, उपप्राचार्या सिस्टर शायनी, सिस्टर सुनीला शाळेचे क्रीडाशिक्षक शेख अनिस, शेख अफरोज, राहुल जंपलवार व सर्व शिक्षकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# प्रा. राम शिंदे विधान परिषद सभापती ?


## भाजपकडून शिक्कामोर्तब; आज अर्ज दाखल करणार

**बीड/प्रतिनिधी**

नागपूर : राज्यात महायुतीने सत्ता मिळविल्यानंतर विधानसभा अध्यक्षपदाची माळ पुन्हा एकदा भाजपच्या गळ्यात पडली. आता, विधानपरिषदेच्या सभापतींच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शिवसेना नेत्या आमदार निलम गो-हे यांनाच पुन्हा सभापतीपदाची संधी मिळेल, असा विश्वास शिवसेना नेत्यांना आहे. मात्र, भाजपकडून राम शिंदे यांना संधी देण्यात येणार असल्याचे समजते. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत राम शिंदे हे कर्जत-जामखेड मतदारसंघातून आमदार रोहित पवार यांच्याकडून पराभूत झाले आहेत.

राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर महायुतीचं सरकार स्पष्ट बहुमताने व मोठ्या संख्याबळाने स्थापन झालं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्य मंत्रिमंडळाचा

विस्तारही झाला. त्यामध्ये ३३ कॅबिनेट मंत्री व ३ राज्यमंत्र्यांचा शपथविधी संपन्न झाला. मात्र, राज्यातील सत्ताबदलानंतर विधिमंडळातील गणितंही बदलली आहेत. भाजपने १३२ जागांवर विजय मिळवत राज्यातील सर्वात मोठा पक्ष होण्याचा बहुम ान पटकावला आहे. फडणवीस सरकारच्या विधिमंडळ अधिवेशनाच्या रणधुमाळीत सध्या विधान परिषदेच्या सभापती निवडीची लगबग पाहायला मिळत आहे. विधानसभा अध्यक्षपदी पुन्हा एकदा राहुल नार्वेकर यांची निवड झाल्यानंतर आता विधानपरिषद सभापतीपदी कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता सर्वांनाच आहे. सध्या राज सरकारचं हिवाळी अधिवेशन सुरू आहे. यातच विधानपरिषदेच्या सभापतीच्या निवडीचा मुहूर्त पार पडणार आहे. सध्या शिंदेंच्या शिवसेनेच्या डॉ. निलम गो-हे या विधान परिषदेच्या उपसभापती आहेत. तर, सभापती पद रिक्त आहे. त्यामुळे आता विधान परिषदेच्या सभापतींची देखील लवकरच निवड केली जाणार आहे. भाजपकडून राम शिंदे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे.



विधानपरिषद सभापती पदासाठी राम शिंदे यांचे नाव चर्चेत आहे, भाजपकडून आज सकाळी राम शिंदे अर्ज दाखल करण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे, भाजपकडून राम शिंदे यांचं पुनर्वसन करण्यात येत असल्याचे दिसून येते.

## मस्साजोग आणि परभणीत घडलेल्या घटनांचा जाहिर निषेध : अँड विशाल मस्के*



पाटोदा (प्रतिनिधी) मस्साजोग ता. केज जि. बीड येथील मा. सरपंच संतोष देशमुख यांच्या झालेल्या क्रुर हत्येसह परभणी येथील संविधानिक विचारांचा तरुण सोमनाथ सुर्यवंशी याचे न्यायालयीन कोठडीत झालेल्या मृत्यु च्या घटने बद्दल अँड. विशाल मस्के यांनी तहसिलदार साहेब पाटोदा यांना निवेदन देऊन दोन्ही ही घटनांचा निषेध व्यक्त केला आहे

## सेंद्रिय शेती मानव जीवनाला काळाची गरज :- कैलास पन्हाळकर



पाटोदा प्रतिनिधी :-खर्च कमी करून उत्पन्न वाढवणे पाटोदा ब्लॉक अंतर्गत काकडहिरा या ठिकाणी वॉटर शेड आणि कृषी विभागाच्या अंतर्गत नैसर्गिक गट शेती कार्यक्रमालागटाचे अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव आणि गावातील सर्व शेतकरी उपस्थित राहून वॉटरशेड च्या माध्यमातून नैसर्गिक शेती ला कस प्रोत्साहन देतो या विषयी सविस्तर माहिती दिली.गांडुळबेड ,डि कंम्पोष्ट, सिटी कंम्पोष्ट, शेतकरी अभ्यास सहल, आणि शेती शाळा या संदर्भात वॉटरशेड च्या माध्यमातून काय झाले आणि यामधून काय बदल झाले या विषयी सविस्तर माहिती दिली.या नंतर डि कंम्पोष्ट प्रात्यक्षिक करण्यासाठी गावातील योग्य बेनेफिसरी निवड करून त्यांना रेन पाईप प्रत्यक्ष वापर कसा करायचा तो दाखवला या वेळी शेतकरी , तालुका कृषी आत्मा प्रमुख तांबडे साहेब आणि तिडके साहेब पन्हाळकर साहेब गणेश रसाळ भरत कवठेकर उपस्थित होते..


## गेट वे हून एलिफंटाकडे जाताना बोट उलटली; घटना दुर्दैवी

## दुर्घटनाग्रस्तांना योग्य मदत करण्यात येईल -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर, दि. १८ : मुंबई येथील गेट वे हून एलिफंटाकडे जाताना बोट उलटली. ही घटना अतिशय दुर्दैवी व दुःखद आहे. अंदाजे सात ते आठ जण बेपत्ता आहेत. त्यांचा शोध सुरु आहे. दुर्घटनाग्रस्तांना योग्य मदत करण्यात येईल असे, निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, बोटीतील लोकांना मदत वेळेवर पोहोचल्यामुळे त्यांना वाचवता आले. या घटनेची अधिकची सविस्तर माहिती घेतली जाईल. दुर्घटना ग्रस्तांना योग्य ती मदत दिली जाईल.

## डॉ..सुधीर रसाळ यांना 'विंदांचे गद्यरुप' या समिक्षात्क पुस्तकासाठी साहित्य अकादमी पुरस्कार

### साहित्य अकादमी साहित्य पुरस्कारांची घोषणा



नवी दिल्ली, 18: मराठीतील सुप्रसिध्द समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना 'विंदांचे गद्यरुप' या समिक्षात्क पुस्तकासाठी मराठी भाषेकरिता साहित्य अकादमी पुरस्कार आज जाहीर करण्यात आला. अकादमीचे सचिव, के. श्रीनिवासराव यांनी साहित्य अकादमी पुरस्कारांची घोषणा केली. देशातील साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च संस्था म्हणून नाव लौकिक असणाऱ्या साहित्य अकादमीने, येथील कॉपर्निकसमार्ग स्थित साहित्य अकादमीच्या रविंद्र सभागृहात वर्ष 2024 साठी साहित्य पुरस्कारांची घोषणा केली. अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत देशातील 21 प्रादेशिक भाषांसाठी साहित्य अकादमी साहित्य पुरस्कारांची निवड व घोषणा करण्यात आली.

डॉ.सुधीर रसाळ यांच्या विषयी

डॉ.सुधीर रसाळ हे मराठीतील मान्यवर समीक्षक आणि लेखक आहेत. त्यांनी 1956 पासून मराठी वाङ्मयाची समीक्षा करत उल्लेखनीय योगदान दिले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १९ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## सं पा द की य

## भारताच्या वाढीचे इंजिन

स्टार्ट-अप्सच्या माध्यमातून भारतात लाखो नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतात. विकसनशील भारताचे रूपांतर विकसित भारतात करण्याची क्षमता त्यात दडलेली आहे. भारत सरकारच्या व्हिजन २०४७मध्ये देशाच्या स्वातंत्र्याच्या शताब्दीपर्यंत ३० ट्रिलियन डॉलरचा जीडीपी आणि १८ हजार ते २० हजार अमेरिकी डॉलरचे दरडोई उत्पन्न या आधारे देशाची अर्थव्यवस्था विकसित अर्थव्यवस्थेत रूपांतरीत करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट आखण्यात आलेले आहे. या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टामध्ये आगामी २३ वर्षांत सध्याच्या चार ट्रिलियन डॉलरपेक्षा किंचित कमी असलेल्या जीडीपीवरून एक उत्तुंग झेप देशाला घ्यायची आहे. हे खूपच धाडसाचे वाटू शकते; परंतु इतिहास दाखवून देतो की, सरकारी धोरणे आणि खासगी क्षेत्रातील पुढाकार यांच्या योग्य संयोजनाने ही झेप घेतली जाऊ शकते आणि हे प्रत्यक्षातही करून दाखविल्याची आधीची उदाहरणे आहेत. सन १९७० ते १९९५ दरम्यान जपानचा जीडीपी २१५ अब्ज अमेरिकी डॉलरवरून २५ पटीने वाढून पाच ट्रिलियन डॉलरपेक्षा जास्त झाला. जपानचे दरडोई उत्पन्न २१०० डॉलरवरून ४४ हजार डॉलरपर्यंत वाढले. भारताला आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याच्या मार्गातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे रोजगार निर्मिती हा आहे. तथापि, विकासाचे भांडवल-केंद्रित मॉडेल मूलतः श्रम-केंद्रित तर अजिबात नाही. विशेषत: एआय आल्यानंतरच्या अर्थव्यवस्थेमध्ये रोबोटिक प्रक्रियेसारखे ऑटोमेशन अतिशय जोमाने आपली पाळेमुळे घट्ट करत चालले आहे. अर्थपूर्ण रोजगार निर्मितीसाठी अवाढव्य उत्पादन (स्केल मॅन्युफॅक्चरिंग) क्षमतेतून देशाच्या लोकसंख्याशास्त्रीय घटकाचा लाभ घेण्यासाठी ङ्गमेक इन इंडियाफसारख्या योजना मदत करतात. या योजनेचा प्रभाव सध्या जाणवत असला तरी देशासमोरील उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ती पुरेशी असू शकत नाही. देशाच्या उद्योजकीय परिसंस्थेमध्ये एक दशलक्ष नव्या उद्योजकांना फुलविण्याचे उद्दिष्ट असलेल्या सरकारच्या स्टार्टअप सपोर्ट प्रोग्रामची म्हणजेच स्टार्टअप सहाय्य योजनेची भूमिका येथे ठळकपणे दिसून येते. आयआयटी, मुंबई येथे आकारास आलेले ङ्गसोसायटी फॉर इनोव्हेशन अँड एंत्रप्रेन्योरशिपफ (ड्खछ्ए) हे इनक्यूबेटर शैक्षणिक संस्थेचे पाठबळ लाभलेले भारतातील सुरुवातीच्या काळातील इनक्यूबेटरपैकी एक आहे. विद्यार्थी, प्राध्यापक आणि माजी विद्यार्थ्यांना उद्योजक बनण्यासाठी हे इनक्यूबेटर प्रोत्साहित करते. विशेषत: विद्यार्थ्यांना नोकरी शोधणारे बनण्याऐवजी नोकरी पुरवठादार म्हणून हे इनक्यूबेटर त्यांची जडणघडण करत आहे. उद्यमशीलता वाढविण्यात आणि तंत्रज्ञान स्टार्ट- अप्सना ङ्गस्टार्ट टू स्केलफ सहाय्य प्रदान करण्याबरोबरच प्रयोगशाळेतून कल्पना/संशोधनाच्या माध्यमातून नवकल्पनांना चालना देण्यास आणि आर्थिक लाभ निर्माण करण्यात इनक्यूबेटर अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. जून २०२४पर्यंत, भारतात १,४०,८०३पेक्षा अधिक स्टार्ट-अप होते. जेव्हा ड्खछ्ए २००४मध्ये सुरू झाली, तेव्हा ही संकल्पना शैक्षणिक क्षेत्रात फारशी अस्तित्वात नव्हती. संस्थापकांना भांडवल पुरवू शकणारे साहस भांडवल अर्थात व्हेंचर कॅपिटल (व्हीसी) फंड फारच अल्प प्रमाणात अस्तित्वात होते. शैक्षणिक संस्थांच्या प्रयोगशाळांमध्ये तंत्रज्ञान कौशल्य अस्तित्वात होते; परंतु त्याचे व्यापारीकरण होऊ शकले नाही आणि ते संशोधकांच्या प्रयोगशाळांपुरतेच मर्यादित राहिले. ड्खछ्ए हे भारतातील पहिल्या इनक्यूबेटर्सपैकी एक होते जे नवोदितांना भविष्यकालीन धोक्यांबाबत सूचित करते, तसेच भांडवलाची आवश्यकता कमी करण्यातही मदत करते. अपयशामुळे सामाजिक कलंक माथी लागतो, त्यावेळेला या इनक्यूबेटरने विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यावसायिक कल्पनांची चाचणी घेण्यासाठी अर्थरूपी वातावरण प्रदान केले. सामायिक कार्यस्थळाची उपलब्धता, आयआयटी, मुंबईमधील तज्ज्ञांच्या विशाल समूहाकडून निधी आणि मार्गदर्शनाव्यतिरिक्त नवकल्पना आणि तांत्रिक कौशल्यासाठी आमचे इनक्युबेटर हे एक प्रयोगशील केंद्र म्हणून नावारूपास आले आहे. आमचे अनुकरण आता इतर शैक्षणिक-आधारित इनक्यूबेटर्स करत आहेत. अनेक सामायिक संसाधने बाजारातील किमतीच्या तुलनेत अतिशय अल्पशः किंमतीत उपलब्ध असल्याने, इनक्युबेटर्स नवजात उपक्रमांचा पैसा वाचवितात आणि संस्थापकांच्या भागभांडवलाचा हिस्सा कमी करण्यास मदत करतात. विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, त्यांचा संस्थापक संघ उभा करणे, संस्थापकामधील करारमदार करणे, भांडवल मिळवणे आणि वाद उद्भवल्यास मध्यस्थी करणे या कामांत इन्क्यूबेटर अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतात. त्याचबरोबर मार्गदर्शन करणे, विविध घटकांशी संबंध प्रस्थापित करणे, बाजारपेठेतील प्रवेश सुलभ करणे आणि त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांना वेळोवेळी पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत इन्क्यूबेटर मदत करतात. इनक्यूबेटरने घडविलेल्या स्टार्ट-अपना पोर्टफोलिओतील इतर फर्म्सच्या अनुभवाचा देखील फायदा होतो. कारण मोठ्या पोर्टफोलिओमध्ये इतरही अनेक संघ असतात आणि त्यांना समान समस्यांचा सामना करावा लागलेला असू शकतो. त्यांचे अनुभव अनेकदा इतरांना उपयोगी पडतात. शैक्षणिक संस्था-समर्थित इनक्यूबेटर प्रदान करत असलेल्या सर्वाधिक लक्षणीय फायद्यांपैकी एक म्हणजे जागतिक दर्जाच्या विद्याशाखेत सहज प्रवेश मिळविणे शक्य होते. सखोल तंत्रज्ञानावर आधारित स्टार्ट-अप्ससाठी हा एक अतिशय महत्त्वाचा फायदा आहे. आपल्या क्षमतांचा विस्तार करण्यास इच्छुक असलेले किंवा व्यावसायिकीकरणामध्ये भेडसावत असलेल्या समस्यांवर संशोधकांचा सल्ला ते जागतिक विद्याशाखांकडून मिळवू शकतात. डीप-टेक स्टार्टअप्सचा ङ्गगर्भावस्थेफचा कालावधी प्रदीर्घ असतो.

# नव्या सरकारचे स्वागत करू या!

**५ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून आणि एकनाथ शिंदे व अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.**

२० डिसेंबरला विधानसभेच्या २८८ जागांसाठी मतदान झाले, २३ डिसेंबरला झालेल्या मतमोजणीत महायुतीचे २३० आमदार विजयी झाले. दि. ५ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून आणि एकनाथ शिंदे व अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. विधिमंडळाच्या नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्व संध्येला म्हणजेच १५ डिसेंबर रोजी राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. ३३ आमदारांनी कॅबिनेट मंत्री व ६ जणांनी राज्यमंत्री म्हणून शपथ घेतली. सरकार स्थापनेला खूपच विलंब झाला अशी टीका झाली. जनतेने महायुतीला प्रचंड बहुमत दिल्यानंतर मंत्रिमंडळ आणि खातेवाटप ठरवायला एवढा वेळ कशासाठी, हे समजले नाही. जुने आणि नवे चेहरे, जातीनिहाय आणि प्रादेशिक समतोल साधण्यासाठी वेळ लागला असावा. सरकारमध्ये जवळपास निम्मे मंत्री हे नवीन चेहऱ्यांचे आहेत. पण आता मंत्रिमंडळ विस्तारानंतर महायुतीत जे नैराश्य नाट्य चालू आहे ते मात्र महाराष्ट्राला भूषणावह नाही. महायुतीमधील भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तीनही पक्षांत ज्यांना मंत्री होता आले नाही अशा नेत्यांची घालमेल होते आहे. आपण मंत्री झालो नाही, हे त्यांना सहन झालेले नाही. कोणी चिडून बोलत आहे, कुणी पक्षाच्या नेत्यावर नाराजी प्रकट करीत आहे, कुणी नागपूरच्या अधिवेशनाला न थांबता सरळ मतदारसंघातील आपल्या घरी निघून गेले, तर कुणी टीव्हीच्या कॅमेरापुढे आपल्या मनातील खदखद व्यक्त करताना दिसत आहे. राज्यात यशवंतराव चव्हाणांपासून आज देवेंद्र फडणवीसांपर्यंत तीसपेक्षा जास्त सरकारे सत्तेवर आली. देवेंद्र यांनी तर मुख्यमंत्रीपदाची तिसऱ्यांदा शपथ घेतली. शरद पवार, वसंतदादा पाटील यांनीही चार-चार वेळा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. पण गेल्या सहा दशकांत सरकार स्थापनेनंतर आपण मंत्री झालो नाही किंवा आपला पत्ता कापला गेला म्हणून कुणी एवढा थयथयाट केला नव्हता. आमदार म्हणून निवडून आलेल्या प्रत्येकाला मंत्री होण्याची महत्त्वाकांक्षा असणे यात गैर काही नाही, पण गेल्या सरकारमध्ये आपण मंत्री होतो म्हणून नव्या सरकारमधेही मंत्रीपद मिळालेच पाहिजे हा हट्ट आता वाढत चालला आहे. आमदार म्हणून निवडून आल्यावर मंत्रीपद मिळाले पाहिजे, अशी महत्त्वाकांक्षा बळावत चालली आहे. टीव्हीच्या कॅमेरासमोर बोलताना, आपल्याला मतदारसंघाच्या विकासासाठी मंत्रीपद पाहिजे असे इच्छुक सांगत असतात. पण त्याचबरोबर त्याला मंत्री का केले व मला का केले नाही, असा प्रश्न विचारत असतात. आता कुणी थांबायला तयार नाही, हे असंतोषाचे प्रमुख कारण आहे. काँग्रेसने महाराष्ट्रावर सर्वाधिक काळ सत्ता उपभोगली आहे. सर्वाधिक मुख्यमंत्री काँग्रेसने दिले आहेत. त्या काळात मुख्यमंत्री व सरकारमधील मंत्री यांची नावे दिल्लीहून काँग्रेस श्रेष्ठी पाठवत होते. आता काळ बदलला आहे. आता भाजपा व मित्रपक्षांच्या मंत्र्यांच्या नावावर भाजपा हायकमांडचे शिक्कामोर्तब होणे गरजचे असते. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात मित्रपक्षांच्या उमेदवारांना भाजपाने आक्षेप घेतल्यावर मित्रपक्षांना त्यांचे उमेदवार बदलावे लागले होते. आता नव्या सरकारमध्ये मंत्री कोण ठरवताना भाजपा हायकमांडची एनओसी असल्याशिवाय नावे निश्चित होत नाहीत. मग आपल्याला मंत्रीपद मिळाले नाही म्हणून वगळलेले व डावललेले नेते का भोकाड पसरत आहेत? ज्यांना वगळले ते तूर्त काहीही करू शकत नाहीत, जे मिळवायचे ते भाजपा श्रेष्ठींच्या मर्जीनुसारच मिळणार आहे, याचे भान ठेवले पाहिजे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमधील बारा मंत्र्यांना देवेंद्र फडणवीस यांच्या नव्या सरकारमध्ये डच्चू मिळाला आहे. हे १२ जण असंतुष्ट आहेत हे लपून राहिलेले नाही. सर्वात जखमी झाले ते छगन भुजबळ. आजवर ते सात वेळा आमदार म्हणून निवडून आले. (राष्ट्रवादी काँग्रेस, येवला, नाशिक) मंत्रीपदे आली व गेली, पण भुजबळ कधीच संपला नाही. मला डावलल्याने मला काही फरक पडणार नाही, जरांगे पाटलांना अंगावर घेतलं, त्याचं बक्षीस मिळालं ना. मी सामान्य कार्यकर्ता. मला डावललं काय नि फेकलं काय, मला अजित पवारांशी बोलण्याची गरज वाटली नाही. मी म्हणजे काय खेळणं आहे का? माझं मंत्रीपद कुणी नाकारलं हे शोधावं लागेल. इति भुजबळ. भुजबळांचा संताप प्रकट झाल्यावर सोशल मीडियावरून धुवांधार प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. अगोदर बाळासाहेबांना सोडले, नंतर काँग्रेस सोडून शरद पवारांची साथ घेतली, नंतर त्यांनाही सोडले. देवेंद्र फडणवीसांची २०१४ ते २०१९ ही कारकीर्द वगळता भुजबळ १९९९ पासून राज्यात सरकारमध्ये आहेत. मनी लॉड्रिंग प्रकरणात ते २६ महिने जेलमध्ये होते. समता परिषद व ओबीसी समाज हे त्यांच्याकडे प्रभावी हत्यार आहे. मंडल आयोगाच्या मुद्द्यावरून त्यांनी बाळासाहेबांची शिवसेना सोडली तसेच मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यास उघडपणे त्यांनी विरोध केला. विधानसभा निवडणुकीत नांदगावमधून ते त्यांचा पुतण्या समीरची बंडखोरी रोखू शकले नाहीत. शिवसेनेत असताना नेते, महापौर, आमदार, मंत्री. राष्ट्रवादीत असताना प्रदेशाध्यक्ष, गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी सारी ताकदवान पदे त्यांनी उपभोगली. अजितदादांच्या पक्षातही ते नंबर दोन होते. आता त्यांना म्हणे राज्यसभेवर पाठवणार, अशा चर्चेला उधाण आले आहे. भाजपाचे दिग्गज नेते सुधीर मुनगंटीवार (भाजपा, बल्लारपूर) यांना सरकारमधून वगळल्याने ते खूप अस्वस्थ आहेत. विद्यार्थीदशेपासून ते संघ स्वयंसेवक, १९९५ पासून भाजपामध्ये सक्रिय, संघटनेत विविध पदांवर काम केले, पक्षाचे प्रदेशाध्यक्षही झाले. मला मंत्रीपद देणार नाही, असे कुणीही सांगितले नव्हते. मंत्रीपद नाकारण्याचं कारण काय, याचा मी विचार करतोय, मी नाराज नाही. मनाविरुद्ध घडत असताना जो काम करतो तो कार्यकर्ता, असे ते सांगत आहेत. रवींद्र चव्हाण (भाजपा, डोंबिवली) यांना मंत्रीपद न मिळाल्याने अनेकांना आश्चर्य वाटले. देवेंद्र फडणवीसांचे ते विश्वासू. तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले. सार्वजनिक बांधकाम खाते त्यांनी संभाळले. एकनाथ शिंदेंचे वर्चस्व असलेल्या ठाणे जिल्ह्यात पक्षाचे काम त्यांनी निष्ठेने केले. विशेष म्हणजे त्यांनी किंचितही नाराजी व्यक्त केली नाही. चंद्रशेखर बावनकुळे यांना मंत्रीपद दिल्याने पक्षाचे प्रदेशाध्यक्षपद चव्हाण यांना दिले जाईल अशी चर्चा आहे. विजय शिवतारे कमालीचे संतप्त झाले. ते म्हणाले, मंत्रीपद महत्त्वाचं नाही, पण मला वाईट वागणूक मिळाली, याचे जास्त वाईट वाटले. तीनही नेते साधे भेटायला तयार नाहीत. आम्ही काही गुलाम नाही अडीच वर्षांनी मंत्रीपद मिळालं तरी घेणार नाही. मंत्रीपद न मिळाल्याने नरेंद्र भोंडेकर (शिवसेना, भंडारा) यांनी पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला. त्यावर स्टंट करू नका, तुमचेच नुकसान होईल, अशा पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाल्यात. दीपक केसरकर (शिवसेना, सावंतवाडी) चार वेळा आमदार झालेत. एकनाथ शिंदे यांच्या निकटचे बंडानंतर शिंदे गटाची बाजू मांडण्याचे काम करीत असत. आपल्याला का वगळले याचे त्यांनीच आत्मपरीक्षण करावे असे ऐकायला मिळाले. तानाजी सावंत (शिवसेना, परांडा) हे बडे प्रस्थ म्हणून ओळखले जातात. शिक्षणसंस्था व व्यवसायाची मालमत्ता २३५ कोटींच्या वर आहे. (अगोदरच्या कारकिर्दीत) मंत्रिमंडळाच्या बैठकीत राष्ट्रवादीच्या शेजारी बसलो की, बाहेर आल्यावर उलटी होते, असे वक्तव्य त्यांनी केले होते. वैचारिक मतभेद म्हणून आपण बोललो असा त्यांनी खुलासा केला होता. अब्दुल सत्तार हे (सिल्लोड) शिवसेनेच्या कोट्यातील एकमेव मुस्लीम मंत्री होते, पण त्यांना नव्या सरकारमध्ये दूर सारले. सत्तार हे अनेकदा वादग्रस्त ठरलेत. हिंदू संघटना त्यांच्या विरोधात आहेत. भाजपाने त्यांच्यावर पूर्वी आरोपाचा भडीमार केला होता. विजयकुमार गावित (भाजपा, नंदुरबार), दिलीप वळसे-पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस, आंबेगाव), सुरेश खाडे (भाजपा, मिरज), धर्मरावबाबा अत्राम (राष्ट्रवादी, अहेरी), अनिल पाटील (राष्ट्रवादी, अमळनेर) या माजी मंत्र्यांनाही नव्या सरकारमध्ये स्थान मिळालेले नाही. संजय कुटे (भाजपा, जामोद, बुलढाणा) म्हणाले विरोधक हरून जिंकले व आपण जिंकून हरलो. सदाभाऊ खोत म्हणाले आम्ही प्रामाणिकपणे तीनही पक्षांचे शेत नांगरून दिले. पण ज्यावेळी आमचे शेत नांगरण्याची पाळी आली, तेव्हा आमच्या शेतात बैलाला धारही मारू दिली नाही. गोपीचंद पडळकर, डॉ. राहुल आहेर अशी नाराजांची यादी बरीच आहे. नाराजी विसरून सरकारला साथ देणे यातच त्यांचे व त्यांच्या मतदारसंघाचे हित आहे

# शरद पवार संतोष देशमुख कुटुंबीयांची भेट घेणार

गेल्या काही दिवसापासून राज्यभरात गाजत असलेल्या बीडमधील संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्या तपासाला गती यावी, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद-चंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद हे आता बीडला जाणार आहेत. संसदेचे हिवाळी अधिवेशन २० डिसेंबरला संपत आहे. हे अधिवेशन संपताच दुसऱ्याच दिवशी शरद पवार हे बीडच्या दौऱ्यावर जाणार आहेत. शरद पवार हे मस्साजोग गाव-ात जाऊन मृत संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेणार आहेत. कालच आमदार रोहित पवार यांनी मस्साज-ोग येथे जाऊन देशमुख कुटुंबीयांची विचारपूस केली होती. १० दिवसांपू-र्वी संतोष देशमुख यांची हत्या झाली होती. शरद पवार सांत्वनपर भेटीसाठी देशमुख कुटुंबियांच्या भेटीसाठी जाणार आहेत. आता शरद पवार मस्साज-ोग गावात येऊन पोलीस तपास आणि अन्य परिस्थितीचा आढावा घेतील. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांचं ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण झालं आणि त्यानंतर त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. त्यांचा मृतदेह केज परिसरात आढळून आल्यानंतर मोठी खळबळ उडाली होती.

# मुंबईचा सुपुत्र ते जगप्रसिद्ध तबलावादक!



तबलावादनाला जगभरात वेगळी ओळख करून देणारे महान तबलावादक झाकीर हुसेन यांचे हृदयाशी संबंधित समस्यांमुळे अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को येथील रुग्णालयात रविवारी निधन झाले. अनेकांना प्रसिद्ध घराण्याचा वारसा लाभलेला असतो. त्यापैकी काही जण वारसा पुढे नेतात. मात्र, झाकीर यांनी आपल्या वडिलांचा वारसा केवळ पुढे नेला नाही तर आपल्या घराण्यासह संपूर्ण देश आणि तबलावादनाला जगात वेगळी ओळख निर्माण करून दिली. भारतीय शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात तबला या वाद्य प्रकाराचे नाव घेतले जाते तेव्हा उस्ताद झाकीर हुसेन यांचे नाव सर्वप्रथम डोळ्यांसमोर येते. त्यांचे तबलावादन आणि लाईव्ह कॉन्सर्ट म्हणजे मेजवानीच असायची. तबल्यावर त्यांच्या बोटांमधून निघणारे सूर मनात रुंजी घालत असायचे. त्यांचे लाखो, करोडो चाहते आहेत. त्यांनी वादन केलेला तबला जो कुणी ऐकायचा त्या तबल्याची थाप ऐकणारा ङ्गवाह उस्ताद वाहफ असे म्हटल्याशिवाय राहत नव्हता. आता पुन्हा ती तबल्याची साथ ऐकायला मिळणार नाही म्हणून या तबला उस्तादाच्या निधनाने जगभरातील चाहते शोकसागरात बुडाले आहेत. ७३ वर्षांचे अनमोल आयुष्य लाभलेल्या या तबला तपस्वीची जन्मभूमी मुंबई. त्यांच्या निधनाने मुंबईने एक अनमोल सुपुत्र गमावला. झाकीर हुसेन यांचा जन्म ९ मार्च १९५१ रोजी मुंबईत माहीम येथे झाला. त्यांचे वडील उस्ताद अल्ला रख्खा हेसुद्धा सुप्रसिद्ध तबलावादक होते. उस्तादांचा उस्ताद अल्ला रख्खा आणि बिवी बेगम यांचे मोठे अपत्य म्हणजे झाकीर हुसेन. त्यांचे भाऊ, तौफिक कुरेशी आणि फझल कुरेशी हे देखील उत्कृष्ट तबलावादक आहेत. दुर्दैवाने त्यांचा आणखी एक भाऊ मुनव्वरचे लहान वयातच निधन झाले. मुंबईतील माहीम भागात असलेल्या सेंट मायकल स्कूलमधून शिक्षण पूर्ण केल्यानंतर झाकीर हुसेन यांनी सेंट झेवियर्स कॉलेजमधून ग्रॅज्युएशन पूर्ण केले. पण पदवीचे शिक्षण पूर्ण करण्याआधीच ते सेलिब्रिटी झाले होते. वयाच्या अवघ्या ११ व्या वर्षी झाकीर हुसेन यांनी अमेरिकेत त्यांचा पहिला कॉन्सर्ट सादर केला आणि वयाच्या २२ व्या वर्षी म्हणजेच १९७३ मध्ये त्यांनी त्यांचा पहिला अल्बम ङ्गलिव्हिंग इन द मटेरियल वर्ल्डफ लाँच केला. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी झाकीर हुसेन यांना व्हाईट हाऊसमध्ये होणाऱ्या ङ्गऑल-स्टार ग्लोबल कॉन्सर्टफमध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण दिले होते. ही समस्त भारतीयांसाठी मानाची गोष्ट होती. झाकीर हुसेन यांना अनेक प्रतिष्ठित सन्मान मिळाले आहेत. तबला वादनातील अभूतपूर्व योगदानाबद्दल झाकीर यांना केंद्र सरकारतर्फे १९८८ मध्ये पद्मश्री पुरस्कार देण्यात आला. हा सन्मान मिळवणारे ते सर्वात तरुण व्यक्ती ठरले होते. पुढे २००२ मध्ये पद्मभूषण आणि २०२३ मध्ये पद्मविभूषण पुरस्काराचे ते मानकरी ठरले. १९९० मध्ये त्यांना संगीत नाटक अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याच वर्षी, इंडो-अमेरिकन संगीतातील योगदानाबद्दल त्यांना सन्मानित देखील करण्यात आले. १९९२ मध्ये, त्यांना ङ्गप्लॅनेट ड्रम अल्बममसाठी सर्वोत्कृष्ट जागतिक संगीत श्रेणीमध्ये ग्रॅमी पुरस्कार मिळाला. त्यांच्या कारकिर्दीतील हा पहिला पुरस्कार होता. तेव्हा ते ४१ वर्षांचे होते. २००९ मध्ये त्यांच्या ङ्गग्लोबल ड्रम प्रोजेक्टफ अल्बमसाठी दुसरा ग्रॅमी मिळाला. याच वर्षी (२०२४) मिळालेले ३ ग्रॅमी पुरस्कार त्यांच्या आयुष्यातील शेवटचे पुरस्कार ठरले. २०१९ मध्ये झाकीर हुसेन यांना संगीत नाटक अकादमीकडून ङ्गअकादमी रत्नफ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दोन वर्षांपूर्वी झाकीर हुसेन यांना संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल मुंबई विद्यापीठाने ङ्गडॉक्टर ऑफ लॉफ ही पदवी प्रदान केली होती. तबल्याच्या ठेक्याने सर्वांची मने जिंकणाऱ्या झाकीर हुसेन यांनी अभिनयातही हात आजमावला. त्यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये १२ चित्रपटांमध्येही काम केले. झाकीर हुसेन यांच्या पश्चात पत्नी अँटोनिया मिनेकोला आणि दोन मुलीअनिसा आणि इसाबेला कुरेशी आहेत. अफलातून तबला वादनासह लांब केस हे झाकीर हुसेन यांचे स्टाईल स्टेटमेंट बनले होते. बीबीसीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितले होते की, ही कधीही विचार करून हेअरस्टाईल केली नाही. पण हळूहळू लोकांना त्यांची स्टाइल आवडू लागली. मात्र, उस्तादांनी चहा कंपनीच्या ब्रँडसोबत करार केला तेव्हा ब्रँडने त्यांना केस कापू शकत नाहीत अशी अट घातली गेली आणि नंतर लांब केस ठेवणे ही त्याची सक्ती बनली. झाकीर हुसेन यांचे आणि अमेरिकेचे अनोखे नाते होते. त्यांची पहिली लाईव्ह कॉन्सर्ट तिथेच झाली आणि तिथेच त्यांनी जगाचा निरोप घेतला. गेला बराच काळ त्यांचे अमेरिकेत वास्तव्य होते. त्यांची शेवटची सोशल मीडिया पोस्ट देखील अमेरिकेच्या रस्त्यांवरील आहे.

# सभागृहात नाही पण, रस्ता तो मेरा है, आम्ही रस्त्यावर लढाई लढू



## समता परिषदेच्या मेळाव्यातून भुजबळांचा एल्गार

मुंबई : राज्यातील हेवीवेट नेते आमदार छगन भुजबळ यांना मंत्रीमंडळात स्थान न मिळाल्याने समता परिषद व भुजबळ समर्थक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात नाराज झाले आहेत. अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे मंत्रिमंडळात संधी न दिल्यामुळे प्रचंड नाराज झालेले ज्येष्ठ नेते छगन भुजबळ आता राजकारणातील आपल्या नव्या इनिंगला सुरुवात करण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अशातच आज समता परिषदेच्या मेळाव्यातून छगन भुजबळांनी शेरोशाहीरी करत चौफेर फटकेबाजी केली आहे. आम्ही सभागृहात नाही पण, रस्ता तो मेरा है, आम्ही रस्त्यावर लढाई लढू असे म्हणत भुजबळांनी या सभेतून एकप्रकारे एल्गार करत इशारा दिला आहे. दरम्यान आता छगन भुजबळ आज नेमकी काय भूमिका घेतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# वर्ष २०१७ ते २०२० पर्यंतच्या तीन आर्थिक वर्षातील वस्तू व सेवाकरमागण्यांशी संबंधीत

*व्याज किंवा दंड किंवा दोन्ही माफ करण्याची अभय योजना लागू ; ३० मार्च अंतिम मुदत*

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांची विधानसभेत माहिती**

मुंबई, दि. १८ :- महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ विधेयकातील कलम ७३ अंतर्गत वर्ष २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० च्या कर मागण्यांशी संबंधित व्याज किंवा दंड किंवा दोन्ही माफ करण्याची अभय योजना (आपर्शीीू डलहशाश) राज्यात लागू करण्यात आली असून ३१ मार्च २०२५ ही देय कर रकमेचा भरणा करण्याची अंतिम तारीख आहे. त्यापूर्वी देय रकमेचा भरणा केल्यास त्यावरील सर्व व्याज व दंड माफ होणार असल्याने संबंधित व्यापा-यांनी या अभय योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत केले. - या अभय योजनेसंदर्भात अधिक माहिती देताना उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, राज्य प्राधिकरणाच्या अखत्यारीतील करदात्यांकडून साधारण एक लाख चौदा हजार अर्ज अपेक्षित आहेत. विवादित रक्कम ५४ हजार कोटी रुपयांची आहे. त्यापैकी विवादीत कर २७ हजार कोटी रुपयांचा दंड तसेच शास्तीची रक्कम २७ हजार कोटी रुपयांची आहे.

यापूर्वीचा अनुभव विचारात घेता विवादीत कराच्या सुमारे २० टक्के रक्कम योजनेमध्ये जमा होते. त्यानुसार या योजनेमध्ये सुमारे ५ हजार ५०० कोटी ते ६ हजार कोटी रुपये विवादीत कर रक्कम जमा होणे अपेक्षित आहे. यापैकी अर्धी रक्कम म्हणजे २ हजार ७०० कोटी ते ३ हजार कोटी रुपये राज्य शासनास मिळतील व उर्वरित रक्कम केंद्र शासनाकडे जमा होईल. या योजनेमुळे व्यापा-यांना सुमारे ५ हजार५०० ते ६ हजार कोटी रुपयांच्या व्याज व दंडातून दिलासा मिळेल. या अभय योजनेची माहिती करदात्यांना, वकीलांना, चार्टर्ड अकाऊंटंट, नागरिकांना होण्यासाठी व्यापक प्रसिद्धी करण्यात येत असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहात सांगितले.

# आई सोबत शेतात गेलेल्या दोन भावंडाचा विहीरित पडून मृत्य

आई सोबत शेतात गेलेल्या दोन सख्या भावंडाचा विहीरित पडून मृत्यु झाल्याची दुर्दैवी घटना आज मंगळवारी ( दि १७ रोजी ) दुपारी १२ वाजेच्या सुमारास पैठण तालुक्यातील रजापुर शिवारात घडली. आडूळ बु येथील कृष्णा विठ्ठल फणसे यांची रजापुर शिव-ारात गट न २६ मध्ये दोन एक्कर शेती असून त्यांच्या स्वतःच्या शेतात आज मंगळवारी कृष्णा फणसे यांची पत्नी वर्षा फणसे व त्यांची दोन मुले प्रणव व जय असे तिघे जण सकाळी गेले होते. वर्षा फणसे ही शेतातील सोंगलेल्या तुरीचे पेटे एकटी जमा करीत होती तसेच त्यांची दोन्ही मुले बाजुला खेळत असतांना वर्षा हिची नजर चुकुन कठडे नसलेल्या विहीरिकडे ते दोघे जण गेले व तेथे खेळत असतांना त्यांचा तोल जाऊन लहान मुलगा प्रणव वय ६ व मोठा मुलगा जय वय ९ या दोघा सख्या भावंडाचा पाण्यात बुडून मृत्यु झाला.

# बीड आणि परभणी जिल्ह्यातील घटनेच्या निषेधार्थ जिजाऊ ब्रिगेडचे जिल्हाधिका-यांकडे निवेदन

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मसाजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची अमानुषपणे मारहाण करून हत्या करणा-या आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा द्यावी तसेच परभणी येथील आंदोलन कर्ते व संविधान रक्षक सोमनाथ सूर्यवंशी यांचा देखील पोलीस कोठडीत मृत्यू झाला या दोन्ही प्रकरणातील दोषींना कठोरातील कठोर शिक्षा द्यावी या मागणीसाठी जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने



जिल्हाधिका-यांना निवेदन सादर करण्यात आले.

बीड जिल्ह्यातील मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची दि ९-डिसेंबर रोजी अपहरण करून निघृण हत्या करण्यात आली याला १० दिवस उलटून गेले तरी पण आरोपींना अटक झालेली नाही या घटनेचा जिजाऊ ब्रिगेड नांदेड कडून जाहीर निषेध करण्यात येत आहे.सदरील हत्या ही माणुसकीला काळीमा फासणारी आहे.या घटनेमागे एक मोठी बलाढ्य शक्ती आहे ज्यामुळे समाजातील निरपराध लोकांचा बळी जात आहे.या प्रवृत्तीला वेळीच आवर घातला नाही तर समाजाचा पोलीस यंत्रणेवरील व न्यायपालिकेवरचा विश्वास संपून नाईल, तसेच परभणी येथील आदोलन कर्ते व संविधान रक्षक सोममनाथ सूर्यवंशी यांचा देखील पोलीस कोठडडीत मृत्यु झाला या दोन्ही प्रकरणातील दोषींना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी जिजाऊ ब्रिगेड च्या वतीने करण्यात आली.

यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय अध्यक्षा डॉ.विद्या पाटील मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सतिशकुमार जाधव जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा सुमित्रा वडजकर जिल्हाध्यक्षा कल्पना चव्हाण जिल्हा सचिव वनिता देवसरकर कार्याध्यक्षा सुनिता कल्याणकर,अर्चना होगे तालुकाध्यक्षा सुनिता बोंगाणे यांची उपस्थिती होती

# शरदचंद्रजी पवार यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने किल्ले संवर्धनाचे आयोजन.

## डॉ. महेश गोलेकर यांनी राबवला अनोखा उपक्रम.

खर्डा.प्रतिनिधी (प्रा. महेश बजगुडे) खर्डा येथील श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाचे श्री संत गजानन महाविद्यालय,खर्डा व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने एकदिवसीय जिल्हास्तरीय मकिल्ले संवर्धन कार्यशाळा कार्यक्रमफ किल्ले शिवपट्टण येथे संपन्न झाला. या एकदिवशी शिबिराच्या अध्यक्षस्थानी प्रा. अविनाश फलके( विभाग समन्वयक, रासेयो) उद्घाटक म्हणून श्री. विजय झंजाड ( सपोनि,खर्डा) प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. सखाराम वांढरे, श्री शशिकांत मस्के, प्रा. जाधव आदी लाभले.

या कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून बोलताना श्री. विजय झंजाड यांनी रासेयो विभागाद्वारे सामाजिक बदल कसा घडवून आणता येऊ शकतो हे विद्यार्थ्यांना स्पष्ट केले, ऐतिहासिक स्मारकांचा समृद्ध वारसा हा भावी पिढीस संक्रमित व्हावयास हवा, जेणेकरून पुढील पिढीला त्यापासून प्रेरणा निर्माण होईल असे यावेळी बोलताना सांगितले.आपल्या देशाचा, संस्कृतीचा, समाजाचा वारसा टिकून राहावा त्याची ओळख जगाला व्हावी त्याचे व्यवस्थित जतन व्हावे, ऐतिहासिक स्थळे आणि वास्तू कोणताही देश, धर्म,समाज, संस्कृती आणि स्थानिक भाषेचा जिवंत पुरावा असतो. असे यावेळी अध्यक्ष भाषणात प्रा. अविनाश फलके यांनी सांगितले.या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त असा सहभाग लाभला. यामध्ये



जामखेड महाविद्यालय, जामखेड. नूतन महाविद्यालय, मिरजगाव. श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय, खर्डा तसेच लिटल स्टार इंग्लिश स्कूल येथील विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येत सहभागी झाले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक रासेयो विभाग प्रमुख प्रा. शेख मोहसीन, सूत्रसंचालन प्रा. सतीश शिंदे तर आभार प्रदर्शन प्रा. श्रीकांत तनपुरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे सचिव, डॉ.महेश गोलेकर,महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष मा. विजयसिंह गोलेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# अधिक सक्षम होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

## नागपूर प्रेस क्लब येथे पत्रकारांसाठी विशेष व्याख्यान

## आपली पत्रकारिता रिअलटाईमफ करण्यासाठी एआयफउपयुक्त

नागपूर,दि. १८ : माध्यमात कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तिला अधिक माहिती सक्षम होण्याचा मार्ग कृत्रिम बुद्धिमत्तेने म्हणजेच ङ्गएआयफ ने उपलब्ध करून दिला आहे. आपल्या मातृभाषेतून मिळणा-या ज्ञानाला ज्या मर्यादा होत्या, त्या मर्यादा आता ङ्गएआयफ च्या माध्यमातून कमी झाल्या आहेत. ज्या भाषेत आपल्याला माहिती हवी आहे, त्या भाषेत ती सहजरित्या उपलब्ध होते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेपासून दूर राहण्याऐवजी तंत्रज्ञान समजून घेणे आणि आपल्या वापरातून ते अधिक परिपूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.

नागपूर प्रेस क्लब आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक नागपूर कार्यालयाच्या वतीने ङ्गआर्टिफिशल इंटेलिजन्स इन जर्नालिझमफ (कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता) या विषयावर



आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

ज्येष्ठ पत्रकार तथा माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमास नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर - अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, माहिती संचालक किशोर गांगुर्डे, दयानंद कांबळे उपस्थित होते.

श्री. ब्रिजेश सिंह म्हणाले, कोणतेही नवीन तंत्रज्ञान आले की नोक-या कमी होतील, अशी एक भीती व्यक्त होत असते. मात्र तंत्रज्ञानातून नवनवीन संधी निर्माण झाल्याची प्रचिती आपण आजवर घेत आलो आहोत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही अशीच भीती व्यक्त केली जात आहे. वास्तविक याचा परिपूर्ण वापर जर करता आला नाही, तर संबंधितांना आपल्या नोक-या गमाविण्याची भीती अधिक आहे. हे माध्यम वापरतांना मात्र प्रत्येकाला अगोदर स्वत:ला सिध्द करावे लागेल. एआयच्या माध्यमातून जी काही माहिती आपल्यासमोर येईल, त्या माहितीला अधिक पडताळून घेणे, त्यात असलेल्या त्रृट्या दुरूस्त करून अधिक परिपूर्ण करणे, अशा माहितीला नैतिक व संवैधानिक दृष्टीने पडताळून पाहणे व दक्ष राहून चुका दुरुस्त करणे, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असा इशाराही त्यांनी यावेळी बोलतांना दिला. आज विविध समाजमाध्यमांचा लोकांवर प्रचंड प्रभाव आहे. यात अनेक धोके आहेत. एखादी व्यक्ती गाफील राहून आपल्या मोबाईलवर आलेल्या चुकीच्या संदेशाला बळी पडला तर त्याला आर्थिक फसवणुकीलाही तोंड द्यावे लागते, याची अनेक उदाहरणे आहेत. यातील भीती बाजुला सारून आपण दक्ष असायला हवे. इतर प्राणीमात्रांबद्दल व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून ज्या मानवतेच्या दृष्टीने आपण त्यांना पाहतो, त्याच दृष्टीमध्ये संवैधानिक व सत्य -असत्य या परिभाषेत सावध होत ङ्गएआयफला आपण जवळ केले पाहिजे. कोणतीही उत्सुकता ही ज्ञानाच्या स्त्रोतांपर्यंत आपल्याला घेऊन जात असते. पुर्वी या उत्सुकतेला आपण गुगलची जोड देऊन समाधान करून घेतले. आता या उत्सुकतेचे अधिक पुढचे पाऊल म्हणून एआय मार्फत मिळणा-या माहितीकडे पाहावे लागेल, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे म्हणाले, आपल्यामध्ये मुळात असलेल्या गुणवत्तेसोबतच कृत्रीम बुध्दीमत्तेचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. भारत विरोधी कृत्य करण्यासाठी एआय चा वापर होणार नाही, यासाठी एआय ची माहिती भारतीय पध्दतीने तयार करणे आवश्यक आहे. मराठी भाषेलासुध्दा एआय शी जोडावे लागणार आहे. तसेच अशा कार्यशाळांचे अधिकाधिक आयोजन व्हावे, अशी अपेक्षाही राहुल पांडे यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र यांनी केले. संचालन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी तर आभार माहिती संचालक दयानंद कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार बाळ कुलकर्णी, धर्मेंद्र झोरे, भुपेंद्र गणवीर यांच्यासह विविध माध्यमातील पत्रकार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच राज्यातील जिल्हा माहिती कार्यालये आणि विविध पत्रकारिता संस्थांनी ऑनलाईन पध्दतीने व्याख्यानाचा लाभ घेतला.

# अल्पसंख्यांकांना सुरक्षिततेची हमी व मुख्य प्रवाहात आणण्याच्या शासन प्रयत्नाला आणखी गती मिळावी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : भारतीय संविधानाचे गठन झाल्यानंतर देशातील अल्पसंख्यांकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांच्या मनातील असुरक्षिततेच्या भावनेला काढून एकसंघ राष्ट्र निर्मितीसाठी प्रयत्न करणे आणखीही गरजेचे असल्याचा सूर आज झालेल्या अल्पसंख्यांक हक्क दिवसाच्या चर्चासूत्रात व्यक्त करण्यात आला.

जगभरात विविध ठिकाणी विविध जाती, धर्म ,पंथ ,भाषिक समुदाय, अल्पसंख्यांक ठरतात. बहुसंख्यांकांमध्ये अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधित्व व त्यांच्या न्याय हक्काचे रक्षण व्हावे, यासाठी अशा समुदायांना अल्पसंख्याकांचा दर्जा दिला जातो. १८ डिसेंबर हा अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघटनेने १८ डिसेंबर १९९२ रोजी राष्ट्रीय वार्षिक धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांकांच्या हक्काचा जाहीरनामा स्वीकृत करून प्रस्तुत केला आहे. यानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्यांक हक्क दिवसाचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी सुधाकर आडे, मंत्रालयातील सेवानिवृत्त सहसचिव ॲडवोकेट देवेंद्रसिंग निर्मले, तसेच सामाजिक विज्ञान नारायणा ई टेक्नो स्कूल नांदेड येथील विभाग प्रमुख श्री इरशाद अहमद यांच्यासह अधिकारी व अल्पसंख्यांक समुदायातील मान्यवर उपस्थित होते.

या दिवसाच्या निमित्ताने अल्पसंख्याकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्काबाबत जाणीव किंवा माहिती दिली गेली. यावेळी मंत्रालयातील सेवानिवृत्त सहसचिव ॲडवोकेट देवेंद्रसिंग निर्मले, तसेच सामाजिक विज्ञान नारायणा ई टेक्नो स्कूल नांदेड येथील विभाग प्रमुख श्री इर्शाद अहमद यांनी भारतातील अल्पसंख्यांक समुदयांना देण्यात येणा-या



सोयी-सुविधा, अधिकार व त्यामागील घटनात्मक तरतुदीची मांडणी केली.

भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकारानुसार अनुच्छेद १४ ते १८ अनुसार जाती, धर्म, वंश, तसेच जन्मस्थानावरून भेदाभेद करण्यास प्रतिबंधित करते. संविधानातील अनुच्छेद २९ (१) नागरिकांना भाषा, लिपी किंवा संस्कृती जतन करण्याच्या अधिकाराचे रक्षण करण्याची हमी देते. तसेच अनुच्छेद ३० (१) अनुसार अल्पसंख्याक समुदायांना त्यांच्या स्वत:च्या संस्था स्थापन करण्याच्या त्याचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार देते. या सर्व मूलभूत अधिकार घटनेने भारतातील अल्पसंख्यांक समुदयांना दिला आहे. त्यामुळे अल्पसंख्यांकांनी स्वत:ला असुरक्षित समजणे किंवा आपल्या धार्मिक परंपरा पाळणे याबाबत निर्धास्त असावे, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

शासनाच्या धोरणामुळे राजकीय अस्पृशता संपुष्टात आली आहे. अल्पसंख्यांकांचा मुख्य प्रवाहात सहभाग वाढला आहे मात्र ही बाब देशातील सर्व भागातील दुर्गम भागात शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. भारताचे संविधान यासंदर्भात जागरूक असून त्यामार्फत ही प्रक्रिया सुरू राहणार आहे. यासंदर्भात घटनात्मक निर्देशानुसार राजकिय पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. सामाजिक पातळीवरही मानसिकता बदल व शेवटच्या घटकापर्यंत हा बदल होणे अपेक्षित आहे, असे वक्त्यांनी स्पष्ट केले.

याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी शासकीय योजना, अल्पसंख्यांकांच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासन प्रयत्नरत असल्याचे सांगितले. त्यासाठी शासनस्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाचे वेळोवेळी निर्देश असतात. त्यामुळे या दृष्टीने सकारात्मक बदल दिसून येत असल्याचा आशावाद त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी सुधाकर आडे यांनी केले. सहायक जिल्हा नियोजन अधिकारी उमेश वाघमारे व अन्य कर्मचा-यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १९ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात मोठी कारवाई

## आरोपी विष्णू चाटे अटक; स्थनिक गुन्हे शाखेची कारवाई





बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणात एक मोठी अपडेट समोर आली आहे. आरोपी विष्णू चाटेला पोलिसांनी अटक केली आहे. या हत्या प्रकरणातील अटकेत असलेल्या आरोपींची संख्या आता चारवर गेली आहे. विष्णू चाटे हा हत्या आणि खंडणी प्रकरणातील आरोपी आहे. त्याच्यावर हत्येचा कट रचल्याचा आरोप आहे. संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आली होती. संतोष देशमुख यांची गाडी अडवून सहा ते सात जणांनी त्यांचे अपहरण केले. त्यांना बेदम मारहाण करून नंतर त्यांची हत्या करण्यात आली. आतापर्यंत या प्रकरणात तीन आरोपींना अटक करण्यात आली होती, आता चौथ्या आरोपीला अटक करण्यात आली आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणामुळे बीड जिल्ह्यातील राजकारण तापले आहे. राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांच चार दिवसांपूर्वी निलंबन करण्यात आले आहे. त्यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील हे या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले याला केज शहरातील एका हॉटेलमध्ये भेटल्याचे दिसत आहे

## वाल्मिक कराड हाच संतोष देशमुख यांच्या हत्येचा मास्टरमाईंड, त्याला अटक करा-रोहित पवार

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाची एसआयटी नव्हे तर न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे. मी या प्रकरणात कोणत्याही मंत्र्याचे नाही, तर खंडणीखोर वाल्मिक कराडचे नाव घेत आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येमागे वाल्मिक कराडचा हात असल्याचा आरोप गावकरी करत आहेत. त्यामुळे त्याला अटक झालीच पाहिजे, असे ते म्हणालेत.रोहित पवार यांनी मंगळवारी मस्साजोग येथे जाऊन पीडित कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी पत्रकारांशी बोलताना रोहित पवार म्हणाले की, संतोष देशमुख यांच्यासोबत ९ डिसेंबर रोजी अत्यंत भीतीदायक व अमानवीय घटना घडली. या घटनेत अनेक मोठ्या लोकांचा हात असल्याची बाब सर्वश्रूत आहे. वाल्मिक कराडविरोधात पवनचक्की प्रकल्पाकडून २ कोटींची खंडणी मागितल्याचा गुन्हा दाखल आहे. त्यात वाल्मिक कराड हाच मास्टरमाईंड आहे. त्याला लवकरात लवकर अटक झाली पाहिजे. त्याचे सर्व फोन कॉल्स तपासले पाहिजेत. मी या प्रकरणी कोणत्याही मंत्र्याचे नव्हे तर खंडणी मागणाऱ्या आरोपी वाल्मिक कराडचे नाव घेत आहे. पोलिसांनी वेळीच कारवाई केली असती तर ही हत्या झालीच नसती. संतोष देशमुख यांच्या हत्येमागे वाल्मिक कराडचा हात असल्याचा आरोप गावकरी करत आहेत. असे असेल तर त्याला तत्काळ अटक झाली पाहिजे. प्रस्तुत प्रकरणात केवळ एसआयटी नेमून न्याय मिळणार नाही.

### वाल्मिक कराड हाच मास्टरमाईंड

ते पुढे म्हणाले, पवनचक्की प्रकल्प परिसरात ६ डिसेंबर रोजी वाद झाला होता. पोलिसांनी या वादाची साधी तक्रार घेतली नाही. या घटनेनंतर २ दिवसांनी संतोष देशमुखची हत्या झाली. या हत्येनंतर वाल्मिक कराडवर खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. या खंडणी प्रकरणात जी नावे आहेत, तीच नावे या हत्या प्रकरणात आहेत. त्यामुळे या सर्वांचा मास्टरमाईंड वाल्मिक कराड हाच असल्याचे स्पष्ट होत

एसआयटी नव्हे तर न्यायालयीन चौकशी करा या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्याची गरज आहे. कारण, यापूर्वी कोकणात एका पत्रकाराची हत्या झाली. त्यानंतर महाराष्ट्र भूषण कार्यक्रमातही १६ जणांचा बळी गेला. बीडमध्ये दंगल जाली. या सर्व प्रकरणात एसआयटी स्थापन करण्यात आली. पण त्याचा अहवाल किंवा त्यावर काय कारवाई झाली याची काहीच अपडेट आली नाही. त्यामुळे या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करून त्याचा अहवाल जनतेपुढे मांडण्यात यावा, असे ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी बीडचे पालकत्व घ्यावे रोहित पवार यांनी यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना बीडचे पालकत्व घेण्याची विनंती केली. बीड जिल्ह्यात एखादा चांगला अधिकारी आला तर त्याला दीड-दोन महिन्यात बाहेर काढले जाते. त्यामुळे आता देवेंद्र फडणवीस यांनीच या जिल्ह्याचे पालकत्व घ्यावे आणि जिल्ह्यातील गुन्हेगारी संपवावी, असे ते म्हणाले.

### संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना तात्काळ फाशीची शिक्षा द्या-आ.नमिता मुंदडा

नागपुर : केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचे पडसाद हिवाळी अधिवेशनात आज दुसऱ्या दिवशीही विधानसभेत उमटले. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी आज आक्रमक पवित्रा घेत या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करून तत्काळ फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी सभागृहात केली. संतोष देशमुख यांच्या नृशंस हत्येमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरूला. राज्यभरातून या घटनेचा तीव्र निषेध होत आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अद्यापही फरार असल्याने जनतेत क्षोभ आहे. या हत्याकांडाचे पडसाद हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच उमटण्यास सुरुवात झाली. अधिवेशनाच्या आज दुसऱ्या दिवशी आ. नमिता मुंदडा यांनी औचित्याचा मुद्दा करत हा गंभीर प्रश्न सभागृहात उचलला. आ. मुंदडा म्हणाल्या की, माझ्या मतदार संघातील मस्साजोग येथे दोन वेळेस सरपंच राहिलेले संतोष देशमुख हे अतिशय चांगले व्यक्ती होते. यांनी त्यांच्या गावात खूप चांगले काम केले आहे. अशा या लोकप्रिय व्यक्तीचे भरदिवसा राष्ट्रीय महामार्गावरून अपहरण झाले. तीन तासानंतर त्यांचा मृतदेह आढळून आला. अतिशय अमानवीय पद्धतीने मारहाण करून, हाल हाल करून त्यांचा खून करण्यात आला. देशमुख यांच्या खून प्रकरणी सात आरोपींवर गुन्हा नोंदवण्यात आला. ९ डिसेंबरला हे प्रकरण झाले, मात्र आज आठ दिवस उलटूनही फक्त तीन आरोपी अटकेत आहेत, मुख्य आरोपीसह चार आरोपी अद्यापही फरार आहेत. या सर्वांना तत्काळ अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी. या घटनेमुळे जिल्हाभरातील लोकांमध्ये संताप आहे, भीती आहे. नागरिकांनी बंद पाळून, आंदोलने करून याचा निषेध नोंदवला. लोकांच्या मनातील भीती काढण्यासाठी आणि कायदा सुव्यवस्था याबाबत विश्वास देण्यासाठी सर्व आरोपींना फाशीसारखी कठोर शिक्षा द्यावी अशी मागणी आ. नमिता मुंदडा यांनी केली. दोन वेळेस घेतली मुख्यमंत्र्यांची भेट संतोष देशमुख यांची हत्या झाल्यापासून मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दोन वेळेस भेट घेऊन या प्रकरणाची सखोल चौकशी कारवी, सर्व दोषींना कोणत्याही प्रकारची दयामाया न दाखवता कठोरात कठोर शिक्षा देण्यासाठी प्रयत्न करावेत अशी विनंती केल्याचेही आ. मुंदडा यांनी सभागृहात नमूद केले. जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था सुरळीत करण्यासाठी तातडीने कठोर पाऊले उचलावीत अशी विनंती देखील आ. मुंदडा यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.



### वाचन संस्कृती रुजवण्यासाठी शिक्षकाने सुरू केली वाचन चळवळ

पिंपळवंडी । प्रतिनिधी लहान मुलामध्ये शैक्षणिक पुस्तकांसोबत अवांतर वाचनाची गोडी वाढावी व त्यातून वाचनाची आवड निर्माण व्हावी.ह्या एकमेव उद्देशाने प्रेरीत होऊन पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.स्वामी अमृत भारती माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यरत असलेले गणित विषयाचे शिक्षक अशोक नजान सर यांनी स्वखर्चाने काही गोष्टीची , विज्ञान विषयक,गंमती जमंती,लहान मुलांच्या गोष्टी असे अनेक प्रकारची पुस्तके खरेदी करून ती मुलांपर्यंत वाचनासाठी पोहचविण्याचे कार्य चालु केले आहे. सद्याची पिढी ही मोबाईलकडे जास्त प्रमाणात आकर्षित झाल्यामुळे त्यांचे वाचनाकडे दुर्लक्ष होत आहे.चांगले विचार,योग्य ज्ञान मिळवण्यासाठी वाचन अतिशय महत्वाचे आहे.त्याकरिता अगदी बाल वयात विद्यार्थ्यात वाचनाची गोडी निर्माण होण्यासाठी मवाचन चळवळफ नावाने एक चळवळ उभी करण्याचे सरांनी ठरवले त्या करता उद्धव पवार सर,लक्ष्मीकांत घुमरे सर,महेश भोसले सर,राजेंद्र डिसले सर,अमोल लाड सर,राहुल भोसले सर यांसह काही जणांनी योगदानही केले आहे. प्रत्येक शनिवारी पाटोदा तालुक्यातील एका शाळेला ही पुस्तके अशोक नजान सर स्वतः घेऊन जातात व मुलांना ती वाचनासाठी देतात.मुलं देखील आपल्या अभ्यासाशिवाय हि पुस्तके आवडीने वाचतात.सोबतच वाचनाची आवड निर्माण होत असल्याचे तेथील शिक्षक सांगतात,ज्ञानी व वैचारिक पिढी घडविण्यासाठी वाचन होणं गरजेचे आहे.त्यासाठी मोठ्या प्रमाणात वाचन चळवळ टिकणे गरजेचे असल्याचे सरांनी बोलताना सांगितल

## अल्पसंख्यांक समाजाच्या योजनाची अंमलबजावणी व्हावी-मोहमद खमरोद्दीन

बीड । प्रतिनिधी राष्ट्रीय अल्पसंख्याक दिन दरवर्षी १८ डिसेंबर रोजी देशभरात साजरा केला जातो अल्पसंख्यांक दिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्यांक दिन उत्साहात साजरा करून अल्पसंख्याकाचे सामाजिक आर्थिक राजकीय व शैक्षणिक प्रश्न सोडवण्यासाठी उपाय योजना राबवण्याची आवश्यकता असल्याची मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे शहराध्यक्ष मोहम्मद खमरुद्दीन यांनी केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात दरवर्षी १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्यांक दिन साजरा केला जातो मात्र शासनाच्या आदेशाचे पालन करून केवळ औपचारिकता म्हणून अल्पसंख्यांक कार्यकर्त्यांना निमंत्रण करून कार्यक्रम आयोजित केला जातो उपरोक्त कार्यक्रमात अल्पसंख्यांक समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी कोणतेही ठोस प्रयत्न केले जात नाहीत त्यामुळे येत्या १८ डिसेंबर रोजी होणाऱ्या अल्पसंख्याक दिनानिमित्त मुस्लिम सेवाभावी संस्था आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय सहभाग घेणाऱ्या लोकांना अल्पसंख्यांक समाजाच्या आर्थिक सामाजिक राजकीय आणि शैक्षणिक समस्येवर चर्चा करण्यासाठी आमंत्रित करावे अल्पसंख्याक समाजाच्या विभिन्न प्रश्न सोडवण्यासाठी कसा तोडगा निघावा त्यावर चर्चा होणे काळाची गरज आहे मुस्लिम इतर समाजाच्या तुलनेत सर्वाधिक माग असलेला आहे. त्यामुळे मुस्लिम समाजाच्या प्रगती करिता पुढे घेऊन जाण्यासाठी शासकीय प्रशासनाने प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मोहम्मद खमरोद्दीन यांनी म्हटले आहे

## पवनचक्की कंपनीकडून फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी शिवसेनेकडे लेखी तक्रारी द्याव्यात : मुळूक, गलधर

### पवनचक्कीवाल्यांच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शिवसेना आक्रमक





बीड जिल्ह्यात पवनचक्कीचे जाळे दिवसेंदिवस पसरत असून गुंडगिरी ही वाढत आहे. शेतात पवनचक्की उभारण्यासाठी या कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात आहे. पवनचक्की कंपनीच्या त्रासाला आणि गुन्हेगारीला वैतागून काही शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पवनचक्की कंपन्यांच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शिवसेना आक्रमक झाली असून पवनचक्की कंपनीकडून फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी शिवसेनेच्या जिल्हा कार्यालयात लेखी स्वरुपात तक्रारी द्याव्यात असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी केले आहे. जिल्ह्यात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू असून पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना जमिनीचा मावेजा दिला जात नाही. शेतकऱ्यांनी मावेजा मागितल्यास स्थानिक गुंडांकडून धमकावण्याचे प्रकार घडत आहेत. तसेच शेतकऱ्यांनी मावेजासाठी पवनचक्कीचे काम अडविले तर कंपनीचे अधिकारी पोलिसांना हाताशी धरुन उलट शेतकऱ्यांनाच जेलमध्ये टाकण्याची धमकी देतात. असा आरोप मुळूक, गलधर यांनी केला आहे. पवनचक्कीवाल्यांकडून शेतकऱ्यांची रितसर परवानगी न घेता त्यांच्या शेतामधून तार ओढण्याचे काम केले जात आहे. पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराला वैतागून सुलतानपूर येथील एका शेतकऱ्याने अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला तर नाईकवाडे नामक शेतकऱ्यावर गुन्हा दाखल करण्याचा प्रकार घडला आहे. ज्या गावात पवनचक्की उभारण्याचे काम सुरु आहे त्या गावात या कंपनीकडून स्थानिक गुंडांना हाताशी धरून शेतकऱ्यांना धमकवण्याचे व फसवणुकीचे प्रकार घडले आहेत. पवनचक्की कंपनीच्या गुन्हेगारीला वैतागून शेतकरी टोकाचे पाऊल उचलत आहेत. आता पवनचक्की कंपनीच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी बीड जिल्हा शिवसेना आक्रमक झाली आहे. पवन चक्की कंपनीकडून जिल्ह्यात ज्या शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे. त्या सर्व शेतकऱ्यांनी कागदपत्रांसह शिवसेना बीड जिल्हा कार्यालय बार्शी रोड येथे लेखी स्वरूपात तक्रार दाखल कराव्यात असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी केले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com